
Reviews of Literature
ISSN No : 2347-2723
International Recognized Multidisciplinary Research Journal

ISSN 2347-2723 Impact Factor : 2.0210 (UIF) [Yr.2014] Volume - 3 | Issue - 6 | Jan - 2016



# राजर्षी शाहू व स्त्री शिक्षण

डॉ. बाबासाहेब गणपतराव देशमुख
शिवाजी कला, वणिज्य व विज्ञान , महाविद्यालय कन्नड जि. औरंगाबाद.

***प्रस्तावना :***

ब्रिटीश राजवटीत महाराष्ट्राची जडणघडण करण्यात ज्या थोर पुरूषांनी मोठा वाटा उचलला त्यापैकी राजर्षी शाहू छत्रपतीचा सिंहाचा वाटा होता. विसाव्या शतकात पहिल्या दशकात एक प्रगतशील राज्यकर्ता म्हणून शाहू महारांजाचा उदय झाला. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासातली एक वादळी आणि निर्मितीशील शक्ती म्हणून शाहू महाराजांचा उल्लेख करावा. लागतो. या राजाने आपली सत्ता केवळ लोककल्याणाच्या हेतूनेच उपयोगात आणली. सामान्य माणसाला शोषणमुक्त जीवन जगण्याची संधी मिळावी ही त्यांची भूमिका होती, त्याचबरोबर भारतीय समाजात सर्वांगीण स्वातंत्र्य, समता, आणि बंधूत्व ही त्रिसूत्री प्रत्यक्ष कार्यवाही व्हावी म्हणून ज्या महापुरूषांनी आपले आयुष्य सर्वस्वपणाला लावले ते म्हणजे छत्रपती शाहू महाराज होय.

राजर्षी शाहू महाराजाच्या एकंदरीत कार्याचा आढावा घेत. समाजातील उपेक्षित घटकाला प्राधान्यक्रम देण्या बरोबरच त्यांच्यात सामाजिक, राजकीय, अर्थिक आणि शैक्षणिक विकास घडवून आणण्याचे अद्वितीय असे क्रांतीकारी कार्य केले. धर्मनिरपेक्ष राज्य आणि राजा असे समीकरण असणारे कृतीशील व्यक्तीमत्व, शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे असे त्यांना वाटत होते, त्यामुळे त्यांनी गरीबीमुळे शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये, या उद्‌देशाने कोल्हापुर शहरास वसतीगृहाची जननी बनविणे शिक्षण क्रांतीचे प्रेषित, आरक्षणाचे जनक तसेच अस्पृश्योद्वार हे राजर्षी शाहू महाराज हे वर्तमान काळाचे समीकरण बनले आहे. एक समाज क्रांतीकारक, राजा, परंपरा आणि आधुनिकता यांची सांगड घालणारा राजा या एकंदरीत विशेषणाच्या अंगाने राजर्षी शाहू महाराजाच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकण्याचे कार्य सातत्याने विविध क्षेत्रातील कार्य करणाऱ्या विचारवंतांनी केलेले आहे. राजर्षी शाहू महाराजाचे स्त्रीयांच्या संदर्भातील जे कार्य आहे ते जनमाणसापर्यत इतर कार्याप्रमाणे म्हणावे तितके विस्तारितपणे पोहचले नाही अथवा त्यांच्या गळी उतरले नाही. म्हणून प्रतिगामी विचाराच्या तत्कालीन समाजात स्त्रियांच्या एकंदरीत/सर्वागीण विकासासाठी शैक्षणिक शाहू महाराजांनी आपल्या राज्यामध्ये केलेल्या परिवर्तनाचा स्त्री विषयक दृष्टीकोन किंवा स्त्रीयांच्या उध्दारासाठी त्यांनी केलेल्या अभूतपुर्व कार्याचा आढावा शिक्षण विषयक पुरोगामी विचार स्पष्ट होतात. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे स्त्री विषयक विचार व कृती आजच्या समाजाच्या परिवर्तनाला मार्गदर्शक ठरली आहे.

गेली शेकडो वर्षे आपल्या देशाची संस्कृती ही कटटर पुरूषप्रधान होती आणि अद्यापपर्यंत ही त्यामध्ये फारसा बदल झालेला दिसून येत नाही. त्यामध्ये स्त्रीयांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली गेली होती, स्त्रीयांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य महात्मा फुल्यांच्या पासून आगरकरांपर्यंत अनेक सुधारकांनी केले होते. शाहू महाराजांनीही आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिले ''जो पर्यंत भारतातील प्रत्येक स्त्री—पुरूषास शिक्षण मिळत नाही. तो पर्यंत भारत स्वतंत्र, समृध्द एकजीव आणि बलवान होऊ शकत नाही''असे राजर्षी शाहू महाराजांचे स्पष्ट मत होते. यावरून त्यांचा दुरदृष्टी पणा लक्षात येतो.तत्कालीन समाजात स्त्रीयांच्या शिक्षणासंबंधी अनेक अनिष्ठ, अमार्मिक व विपरित कल्पना व रूढी परंपरा घर करून होत्या. मुली वस्त्रीया शिकल्यानंतर त्या स्वैराचारी व बेताल होतील, हिंदू धर्म बुडेल, थोरामोठयांच्या मान ठेवणार नाहीत. कुंटूबात काहीतरी अनिष्ठ घडेल एवढेच नव्हे तर त्या शिक्षणाने विधवा होतील इथपर्यंत विविध तर्क, कुतर्क काढले जात होते. अशा प्रतिकुल सामाजिक परिस्थितीतहीराजर्षीनी स्त्री शिक्षण हे आपल्या सुधारणाचा एक प्रमुख भाग म्हणून त्यांनी हाती घेतला.

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापुर संस्थानाची राज्यसुत्रे हाती घेताच सर्वप्रथम त्यांनी मुलीच्या शिक्षणाची व्यवस्था पाहण्यासाठी एक खास स्त्री शिक्षणाधिकाऱ्याचे पद निर्माण करून रखमाबाई केळवकर या बुध्दिमान स्त्रीची नेमणूक केली होती ''प्रारंभीच्या काळात स्त्रीशिक्षणाला गती देण्याच्या हेतूने कोल्हापुर बाहेर भूदरगड, आजरा यासारख्या ग्रामीण डोंगरी भागात मुलींच्या शाळा सुरू केल्या'' विशेषतः मुलींच्या शिक्षणात शिक्षकांनीअधिक रस घ्यावा म्हणून मुला—मुलींना एकत्र शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचे कार्य त्यांनी मुलींना व तसेच शिक्षकांनीतळमळीने मुलींना शिकवावे या उद्देशाने खास बक्षिसे व इनाम देण्याच्या योजनेतुन केले. यावरून राजर्षी शाहू महाराजांच्या स्त्री शिक्षणविषयक धोरणाची प्रचिती लक्षात येते.

शाहू महाराजांनी पौढ स्त्रियांच्या बाबतीतली विशेष लक्ष घालून मागास जातीतील शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठी राहण्या जेवणासहित शिक्षणाची व्यवस्था केली. स्त्रीच्या उच्च शिक्षणाबाबत शाहू महाराजांचा दृष्टीकोन उदार, व्यापक व पुरोगामी होता. राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी मोफत शिक्षण केले होते. रखमाबाईच्या कन्या कृष्णाबाई यांना महाराजांनीच वैद्यकीय शिक्षणासाठी मुंबई ग्रॅंट मेडिकल कॉलेजमध्ये पाठवून त्यांना डॉक्टर बनविले आणि कोल्हापुरच्या एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटलमध्ये वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्त केले. यावरून असे दिसून येते की, शाहु महाराजांनी स्त्रीयांना शिक्षण देऊन अर्थिक स्वावलंबी बनण्यासाठी तिच्या हाताला काम दिले.

शाहू महाराजांच्या स्त्री शिक्षण विषयक धोरणाची खरी कसोटीलागलीती. राणी इंदुमतीदेवीयांच्या शिक्षणाच्याप्रसंगाने. त्या अकालीविधवा झाल्यानंतरत्यांनी आपल्या भावी जीवनात समर्थपणे उभे राहवे यासाठी शिक्षण देण्याचे महाराजांनी मनावर घेतले. पण त्यासाठी खुद राजपरिवारातून त्यांना विरोध झाला. या विरोधाचाविचार नकरता सोनतळी कॅम्पवर इंदुमतींना शिक्षण देण्याचा धाडसी निर्णय घेतला.

या निर्णयाच्या संदर्भात डॉ. अरूणा ढेरे यांनी म्हटले आहे की, एक कर्ता सुधारक राजा आणि प्रागतिक उदारमनस्क पुरूष म्हणून शाहू महाराजांचेया प्रसंगीचे वर्तनसदैव लक्षात राहणारे आहे. यावरून महाराजाचा पुरोगामी विचार प्रतित होतो.करवीर संस्थानातील मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे या हेतूने आपली कन्या अक्कासाहेब यांच्या विवाहप्रित्यर्थ त्यांच्या नावानेच भावनगरच्या महाराणी नंदकुवर यांच्या नावाने शिष्यवृत्या जाहीर केल्या. अशा प्रकारे शाहू महाराजांनी मुलींच्या शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केला. आपल्या संस्थानात स्त्रीशिक्षणाला त्यांनी गति तरदिलीचपरंतु संस्थानाबाहेर स्त्रीशिक्षणासहीत्यांनी सक्रीय पाठिंबा देऊनअर्थिक मदतकेली. त्यांनी महाराष्ट्राबाहेर गुजरातमधील भावनगर संस्थानाला मदत होती. अशाप्रकारे शाहू महाराजांच्या स्त्री शिक्षणाबाबतचा व एकूणच शिक्षणाबाबतचा दृष्टीकोन व्यापक होता.

## सारांश

राजर्षी महाराजांनी शिक्षण क्षेत्रात विचारपुर्वक व दुरदर्शीपणे आखलेले धोरण त्याची निर्धारपुर्वक व कणखरपणाने केलेली अंमलबजावणी त्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम व दाखवलेले धैर्य, त्यांचा दुरगामी परिणाम आणि त्यामुळे घडून आलेलीसामाजिक प्रगती या गोष्टींचा महाराष्ट्रातील जनतेवर विशेष प्रभाव पाडणाऱ्या ठरल्या आहेत. आधुनिक व पुरोगामी महाराष्ट्राची घडण ही राजश्री महाराजांच्या शिक्षण धोरणाची फलश्रृती होय. त्यांनी केलेल्या स्त्री शिक्षण विषयक सुधारणा तसेच स्त्री शिक्षणाचे महत्व त्यांनी ओळखून स्त्रीयांना शिक्षणउपलब्ध व्हावे या उद्देशाने शाळांची स्थापना करणे, तसेच मुलींना शिक्षणासाठी शिष्युवृत्या देणे. त्याचप्रमाणे मुलींना व्यवसायभिमुख्य शिक्षण मिळाले तर त्या स्वालंबी होतील अशा उद्देशाने त्यांनी नर्सिंग कोर्स सुरू केला. आज

केंद्र व राज्य शासनाने मुलींना शिक्षणासाठी जी पावले उचलली आहेत, किंवा जे परिवर्तन होतांना दिसते आहे, या सर्वाचे मुळ राजर्षी शाहू महाराजांच्या स्त्री शिक्षण विषयक धोरणांची प्रेरणा असे म्हटल्यास वागवे ठरणार नाही.

राजर्षी शाहू महाराजांनी तत्कालीन व्यवस्थेत मांडलेले स्त्री शिक्षण विषयक विचार हे आजच्या आधुनिक युगातही महत्वपूर्ण आहेत.

## संदर्भ ग्रंथ


1. पवार जयसिंगराव (स.पा.)राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापुर, द्वि. आ. 2007
2. फडके य. दि. शाहू छत्रपती आणि लोकमान्य, श्री विद्या प्रकाशन, पुणे 30 प्र. आ. 1985
3. प्वार वसूधा, राजर्षी शाहू छत्रपती एक अभ्यास, सुमेस प्रकाशन, डोंबीवली ( पूर्व ) प्र. आ. 2004
4. धारावकर भास्कर, पाटिल श्यामराव (संपा), राजर्षी शाहू छत्रपतीचे निवडक आदेश भाग–1 पुराभिलेख विभाग महाराष्ट्र शासन मुंबई, 1988
5. डॉ. रमेश जाधव लोकराजा शाहू छत्रपती पुणे,
6. डॉ. रमेश जाधव,शाहू छत्रपती व लोकमान्य, पुणे.